आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२३ जुलै २०२४ - मंगळवार

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज चालू आर्थिक वर्षाचा पूर्ण अर्थसंकल्प लोकसभेत सादर केला. त्यात रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग आणि मध्यमवर्गीयांवर यात विशेष लक्ष देण्यात आलं आहे.

चालू आर्थिक वर्षाचा ४८ लाख २१ हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आज त्यांनी सादर केला. या वर्षात ३२ लाख ७ हजार कोटी रुपयांचा महसूल आणि ४ पूर्णांक ९ दशांश टक्के वित्तीय तूट अपेक्षित आहे. या कालावधीत गेल्या आर्थिक वर्षापेक्षा कमी म्हणजेच १४ लाख १ हजार कोटी रुपयांचं कर्ज घेण्याचा सरकारचा मानस आहे.

<><><><>

नवीन आयकर प्रणालीचा स्वीकार करणाऱ्यांसाठी आणखी कर सवलतींचा लाभ देण्याची घोषणा सीतारामन यांनी आजच्या अर्थसंकल्पात केली. अतिरीक्त १ लाख रुपयांच्या उत्पन्नाला त्यांनी विद्यमान दरापेक्षा कमी कर आकारणीची घोषणा केली. त्यामुळं पगारदारांना आता साडे १७ हजार रुपये कमी आयकर भरावा लागेल. नवीन कर प्रणालीत ३ लाख रुपयांपर्यंत काहीही कर द्यावा लागणार नाही. ३ ते ७ लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना ५ टक्के, ७ ते १० लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना १० टक्के, १० ते १२ लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना १५ टक्के, १२ ते १५ लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना २० टक्के आणि त्यापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांना ३० टक्के दरानं आयकर भरावा लागेल.

नव्या पेन्शन योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या लाभांचा आढावा घेणाऱ्या समितीचं काम सुरू आहे. वित्तीय परिस्थिती लक्षात घेऊन नवीन आणि जुनी

पेन्शनमधली तफावत दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल, असं त्यांनी आज जाहीर केलं.

**<><><><>**

सोने, चांदी आणि प्लॅटिनमवरच्या करांमध्ये अर्थमंत्र्यांनी आज कपातीची घोषणा केली. त्यानुसार सोन्या, चांदीवर ६ टक्के आणि प्लॅटिनमवर ६ पूर्णांक ४ टक्के आयात शुल्क लागेल.

**<><><><>**

भविष्य निर्वाह निधी धारकांसाठी विविध सवलतींची घोषणा आज अर्थमंत्र्यांनी केली. त्यानुसार पहिल्यांदा नोकरीला लागणाऱ्या सर्व नोकरदारांच्या खात्यामध्ये एका महिन्याचा पगार जमा होईल. दर महिन्याला एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या सुमारे २१ कोटी युवकांना याचा फायदा होणार आहे.

उत्पादन आणि सेवा क्षेत्रांना चालना देण्यासाठी येत्या पाच वर्षांत देशातल्या आघाडीच्या ५०० कंपन्यांमध्ये एक कोटी युवकांना वर्षभरासाठी इंटर्नशिपची संधी दिली जाणार आहे.

**<><><><>**

यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी आणि संबंधित क्षेत्रांसाठी १ लाख ५२ हजार कोटी रुपयांची तरतूद आहे. मोहरी, भूईमूग, तीळ, सोयाबीन, सूर्यफूल या तेलबियांच्या बाबतीत आत्मनिर्भर होण्यासाठी सरकार योजना आखत आहे.

**<><><><>**

पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात यावर्षी ११ लाख ११ हजार १११ कोटी रुपयांची गुंतवणूक केंद्र सरकार करणार आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या चौथ्या टप्प्यात २५ हजार गावं रस्त्यांनी जोडली जाणार आहेत. पूर नियंत्रणासह

बिहार आणि आंध्र प्रदेशासाठी विविध सवलतींची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. ग्रामीण आणि शहरी भागात जमीन सुधारणा आणि व्यवस्थापनसंबंधी नवे नियम लागू करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

**<><><><><>**

अर्थसंकल्पात तीन लाख कोटी रुपयांची तरतूद महिला तसंच मुलींसाठीच्या योजनांसाठी आहे. आदिवासीबहुल गावे आणि जिल्हे यांच्या मधल्या आदिवासी कुटुंबांसाठी प्रधानमंत्री जनजाती उन्नत ग्राम अभियान सुरु केलं जाईल. त्याचा लाभ 63 हजार गावं आणि 5 कोटी आदिवासींना होईल.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्प हा ग्रामीण, दुर्बल तसंच शेतकऱ्यांना समृद्धीची वाट दाखवणारा आणि युवावर्गासाठी संधी निर्माण करणारा आहे, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दिली. समाजाच्या प्रत्येक घटकाचा विकास साधणारा असा हा अर्थसंकल्प असल्याचं ते म्हणाले.

२०४७ सालच्या विकसित भारताच्या उद्दिष्टाची पायाभरणी या अर्थसंकल्पातून करण्यात आली असून देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यासाठीची ही सुरुवात असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

सामान्य नागरिकांना या अर्थसंकल्पामुळे कोणताही दिलासा मिळालेला नाही. हा अर्थसंकल्प म्हणजे काँग्रेसचा जाहीरनामा आणि मागचे अर्थसंकल्प यांची नक्कल आहे, अशी प्रतिक्रिया लोकसभेचे विरोधी पक्षनेते **राहुल गांधी** यांनी दिली आहे.

सरकारला पाठिंबा देणाऱ्या राज्यांना या अर्थसंकल्पात भरभरून देण्यात आलं मात्र देशाला सर्वाधिक कर देणाऱ्या राज्याला अर्थसंकल्पात दुय्यम वागणूक दिल्याची टीका विधानसभेचे विरोधी पक्षनेते **विजय वडेट्टीवार** यांनी केली आहे.

**<><><><><>**

अर्थसंकल्प सादर होत असताना देशातल्या शेअर बाजारातली घसरण वाढत गेली. सत्रादरम्यान सेन्सेक्स १ हजार अंकांहून अधिक घसरला होता. आता सेन्सेक्स आणि निफ्टी तेजीत आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रीय प्रसारण दिन आणि आकाशवाणी मुंबई केंद्राच्या ९७ व्या वर्धापनदिनानिमित्त 'शब्द सूर हे झंकारती' हा कार्यक्रम संध्याकाळी ५ वाजता आकाशवाणी मुंबईत होणार आहे. संध्याकाळी ५ वाजता प्रसारित होणारं बातमीपत्र आज ४ वाजून ५२ मिनिटांनी प्रसारित होईल.

**//<><><><><>//**